१४ वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण या योजनेंतर्गत मा.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती/ नुतनीकरणास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण १०१७/४९२/प्र.क्र.२१८/कार्या.११**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ एप्रिल, २०१८.

**वाचा :**
१. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्र.चौविआ १२१६/प्र.क्र.१०७/कार्या.९, दि.१०/११/२०१६.
२. शासन निर्णय, विधी व न्याय विभाग क्र.चौविआ २१६/प्र.क्र.१०/नऊ,दि.१२/६/२०१७
३. प्रबंधक (निरिक्षणे २), उच्च न्यायालय यांचे पत्र क्र.B(W)६०४९/२०१०/१३४४/१७१६७/२०१७, दि.१३/६/२०१७
४. मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे पत्र क्र.१६८२/२०१७, दि.२०/४/२०१७

**प्रस्तावना :**

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केलेल्या "न्याय व्यवस्थेचे सक्षमीकरण" (Strengthening the Justice) या प्रयोजनासाठी सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या ५ वर्षाच्या कालावधीकरीता महाराष्ट्र राज्यासाठी रुपये १०१४ कोटी इतक्या निधीची शिफारस केली आहे. १४ व्या वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण या घटकासाठी ५ वर्षाच्या कालावधीकरीता रु.२२८ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. १४ व्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींची कार्यक्षम अंमलबजावणी करण्यासाठी दि.९/३/२०१६ रोजी उच्चस्तरीय संनियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या बैठकीमध्ये मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या कृती आराखड्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच वित्त विभागाच्या मान्यतेने संदर्भाधीन दि.१२/६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये १४ व्या वित्त आयोगांतर्गत न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्तीच्या कामांना रुपये ५० लक्ष मर्यादेपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत.

या अनुषंगाने मा. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी येथील न्यायालयीन इमारतीची दुरुस्ती / नुतनीकरणाचा सन २०१७-२०१८ च्या दरसूचीवरील प्रस्ताव उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे. सदर अंदाजपत्रक संबंधित उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी तयार केले असून संबंधित कार्यकारी अभियंता तसेच मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांनी साक्षांकित केले आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदर अंदाजपत्रक तपासून प्रशासकीय मान्यतेस सहमती दर्शविली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे नमूद केलेल्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण या योजनेअंतर्गत मा.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती /नुतनीकरणासाठी येणाऱ्या रु.१८,४३,९१२/- (अक्षरी रुपये अठरा लाख त्रेचाळीस हजार नऊशे बारा फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती/ नुतनीकरणाच्या कामाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | न्यायालयीन इमारत | कामाचे स्वरुप | सा.बां.विभागाने अंदाजपत्रकामध्ये परिगणित केलेली रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | अंधेरी | Electrification Work | १८,४३,९१२/- |
| | | **एकूण** | **१८,४३,९१२/-** |

मा.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी येथील न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्ती/ नुतनीकरणासाठी येणारा खर्च "मागणी क्र.जे-१, २०१४ न्यायदान १०२- उच्च न्यायालये, (११) कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण, (११) (०१) कार्यरत न्यायालयाचे नविनीकरण (२०१४ ०५४८) या लेखाशीर्षाखाली मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर कामाची निविदा मागविण्यापूर्वी उपरोक्त कामे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या Dedicated Cell ने निश्चित केलेल्या कामामधीलच असल्याची खातरजमा करण्याची तसेच सदर अंदाजपत्रक सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित करण्याची जबाबदारी मा. मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांची राहील. प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रक्रिया कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडून राबविण्यात यावी व या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने इतर अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करावी.

हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौ.सं.क्र.१२/इमा-२, दि.४/१/२०१८ व त्या विभागाच्या सहमतीने तसेच शासन निर्णय विधि व न्याय विभाग,क्र.चौविआ १२१६/प्र.क्र.१०/का.नऊ, दि.१२/६/२०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४१३१६१२२१५७१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbeda aaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f48164 60b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2018.04.13 16:13:47 +05'30'

( सं.सं.नवगिरे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.विरोधी पक्षनेता (विधान परिषद / विधान सभा)
४) प्रबंधक (निरिक्षणे २), मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
५) मा.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई,
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
७) महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

९) निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
१०) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
११) सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई,
१२) विधि व न्याय विभाग (का.९/२३), मंत्रालय, मुंबई,
१३) निवडनस्ती.